# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थ प्रशासन विभाग
## जाहिरात

जा.क्र.अप्रवि/आस्था/ सलेअ/जाहि/ २४९८ /२०२३ दिनांक :- ३१/०१/२०२३

अर्थ प्रशासन विभागातील ''विवक्षित कामाकरिता'' पात्र सेवानिवृत्त लेखाधिकारी/सहायक लेखाधिकारी यांची सहायक लेखाधिकारी पदावर करार पध्दतीने नेमणुक करण्याबाबत.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१२, दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने अर्थ प्रशासन विभागातील विवक्षित कामांकरीता शासनातील वित्त व लेखा विभागातील लेखाधिकारी/सहायक लेखाधिकारी पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र सेवानिवृत्त अधिका-यांनी आपले अर्ज सोबतच्या नमुन्यात शारीरिक व मानसिक आणि आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ''नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला - ४४४१०४ या पत्त्यावर या जाहिरातीच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत सादर करावेत.

विवक्षित कामाचे स्वरूप

१. विद्यापीठातील विविध आहरण व संवितरण अधिका-यांद्वारे प्रारंभिक लेखा विषयक अभिलेख विहित पध्दतीने विहित नमुन्यात ठेवली आहेत किंवा नाही त्याकरीता वित्तीय नियम आदेश, यांचे यथायोग्य पालन केले गेले किंवा नाही हे पाहणे.
२. या करीता विद्यापीठ अधिनस्त संशोधन केंद्रे महाविद्यालय तथा इतर संस्थांना विविध कार्यालयाच्या अंतर्गत लेखा परिक्षणादरम्यान लेखा व प्रमाणकांची तथा वित्तीय व्यवहाराची तपासणी करणे. त्या अनुषंगाने संबंधित दस्तऐवजांची तपासणी करणे.
३. महसुल प्राप्तीकरता प्राधिकृत अधिका-यांनी घेतलेल्या सावधगीरीचा दर्जा तपासणे.
४. स्थानिक निधी लेखा द्वारा विद्यापीठाचे झालेल्या लेखापरिक्षणाअंती निश्चित झालेली लेखा आक्षेप विविध कार्यालयाकडुन अनुपालन मागवुन निरसन करणे.
५. वित्त विभागास प्राप्त होणारी विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा विषयक प्रकरणे, वेतन निश्चिती प्रकरणे निकाली काढणे तथा सेवानिवृत्तीपुर्वी अधिकारी कर्मचारी यांचे सेवापुस्तकाची तपासणी करणे.
६. नियंत्रक सोपवतील ती जबाबदारी पार पाडणे.

पदसंख्या : एक (०१) पद

अटी व शर्ती :

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिका-यास राज्य शासनाच्या वित्त व लेखा विभागातील लेखाधिकारी/सहायक लेखाधिकारी पदाचा ०३ वर्षाचा अनुभव असावा.
२. करार पध्दतीवर नेमणुक करतेवेळी सेवा निवृत्त अधिका-याचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. ही नियुक्ती प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन ०१ वर्षाच्या कालावधीकरीता असेल व १ वर्षानंतर कामकाजाचा आढावा घेवुन जास्तीत जास्त तीन वर्षाच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.
४. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधित अधिका-यास विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावुन घेण्याबाबत किंवा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क नसेल.
५. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने नेमुन दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंध पत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल.
६. अशा विहित पध्दतीने नेमणुक झालेल्या सेवानिवृत्त अधिका-याला अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतना इतकी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळुन)त्याचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. देय असलेले मासिक पारिश्रमिक व भत्त्याची गणना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय कमांक संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१२, दिनांक

१७ डिसेंबर २०१६ मधील परिशिष्ट अ नुसार करण्यात येईल. सदर निश्चित केलेले पारिश्रमिक त्यांच्या नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील. या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाही. अशा व्यक्तीस आवश्यक प्रसंगी शासकीय कामाकरीता दौरा करावा लागल्यास त्यास सहायक लेखाधिकारी पदास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.किंवा कोणालाही चौकशी प्रकरणात कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

८. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीला कोणतेही पदनाम असणार नाही. तसेच त्यांना कोणतीही अर्जीत, नैमित्तीक, वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकारी असणार नाही. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश या वर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

१०.नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

तरी इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचा अधिकार अर्थप्रशासन विभाग स्वत:कडे ठेवत आहे.

अर्थ प्रशासन विभाग डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

# <u>अर्जाचा नमुना</u>

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत नियंत्रक कार्यालयातील विवक्षित कामासाठी पात्र सेवानिवृत्त लेखाधिकारी/सहायक लेखाधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती.

फोटो

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२. अर्जदाराचा संपुर्ण पत्ता :

३. भ्रमणध्वणी क्रमांक :

४. इ मेल आयडी :

५. जन्मदिनांक व वय :

६. शिक्षण :

७. शासकीय सेवेचा तपशिल :

८. अनुभव :

उपरोक्त सहायक लेखाधिकारी पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर अटींमध्ये जर धोरणात्मकरित्या काही फेरबदल झाला तर सदर बदलास माझी मान्यता राहील.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची सही